महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ १८ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २३३ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### ‘लालपरी’ला डिजिटल कवच

राज्याच्या कानाकोपऱ्यातून धावणारी ‘लालपरी’ ही केवळ वाहतूक सेवा नाही, तर ग्रामीण-शहरी महाराष्ट्राच्या जीवनवाहिनीचे प्रतीक आहे. अशा या सेवेस सुरक्षिततेचे आधुनिक कवच देण्याचा निर्णय हा केवळ तांत्रिक नव्हे, तर दूरदृष्टीपूर्ण धोरणात्मक निर्णय म्हणावा लागेल. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने हाती घेतलेला ‘नवीन सीसीटीव्ही प्रकल्प’ हा त्याच दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. आजच्या अस्थिर सामाजिक-सुरक्षा वातावरणात सार्वजनिक वाहतूक ही संभाव्य धोक्यांच्या छायेत असते. दहशतवादी, समाजविघातक प्रवृत्ती, चोरी, छेडछाड, तोडफोड अशा घटनांना आळा घालण्यासाठी केवळ मनुष्यबळ अपुरे ठरते. अशा वेळी तंत्रज्ञानाची साथ ही काळाची गरज आहे. तब्बल ₹ १११ कोटी खर्चून राबविण्यात येणारा हा प्रकल्प म्हणजे एसटीच्या सुरक्षाव्यवस्थेतील ऐतिहासिक बदल आहे. राज्यभरातील ६३३ ठिकाणी ७०३५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय हा केवळ आकड्यांचा खेळ नाही, तर प्रत्येक प्रवासी, कर्मचारी आणि मालमत्तेच्या सुरक्षिततेची हमी आहे. बसस्थानके, आगार, कार्यशाळा, विभागीय कार्यालये आणि प्रशिक्षण संस्था—सर्वत्र उभारले जाणारे हे डिजिटल जाळे म्हणजे ‘लालपरी’वर ठेवलेली सततची जागरूक नजर आहे. मुंबईत उभारलेला मध्यवर्ती नियंत्रण कक्ष आणि त्याची यशस्वी वापरकर्ता स्वीकृती चाचणी ही बाब विशेष महत्त्वाची आहे. केंद्रीकृत नियंत्रणामुळे संशयास्पद हालचाली तात्काळ हेरून कारवाई शक्य होणार आहे. पायलट टप्प्यात मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघरमध्ये यशस्वी अंमलबजावणी झाल्याने प्रकल्पाच्या कार्यक्षमतेवर शिक्कामोर्तब झाले आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ करत असून, परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी याला स्पष्ट दिशा दिली आहे. ‘सीसीटीव्ही म्हणजे केवळ कॅमेरे नाहीत, तर प्रवाशांच्या विश्वासाचे रक्षण’ ही त्यांची भूमिका या प्रकल्पाचे खरे सार सांगते. खरे तर, हा उपक्रम केवळ सुरक्षेपुरता मर्यादित न राहता प्रशासनिक पारदर्शकता, शिस्त आणि जबाबदारी वाढवणारा ठरणार आहे. प्रवाशांचा विश्वास दृढ होईल, कर्मचाऱ्यांचे संरक्षण होईल आणि एसटीची प्रतिमा अधिक विश्वासार्ह बनेल. अखेर, ‘लालपरी’चा प्रवास वेगवान तर आहेच; पण आता तो अधिक सुरक्षित, तंत्रज्ञानसज्ज आणि विश्वासार्ह होणार आहे. सार्वजनिक सेवेत तंत्रज्ञानाचा असा सकारात्मक वापर हाच खरा विकासाचा मार्ग आहे आणि हा सीसीटीव्ही प्रकल्प त्या दिशेने टाकलेले ठोस पाऊल आहे.

## थोडक्यात महत्वाचे

### लोकलच्या गर्दीवर KDMT ची सकारात्मकता

**ठाणे-डोंबिवली-कल्याण बससेवा सुरू**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १६ ● कल्याण :**
मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गांवरील प्रचंड गर्दी, अपघातांची वाढती संख्या आणि सलग घडलेल्या दुर्दैवी घटनांच्या पार्श्वभूमीवर कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन सेवेने प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी ठाणे–डोंबिवली–कल्याणदरम्यान पर्यायी बससेवा सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. या उपक्रमाला ठाणे महानगरपालिका चीही सक्रिय साथ लाभली असून, लोकलवरील ताण कमी करून नागरिकांना सुरक्षित, सुलभ आणि शाश्वत प्रवासाचा पर्याय उपलब्ध करून देण्याचा प्रशासनाचा मानस आहे.

गेल्या काही दिवसांत लोकलच्या गर्दीतून खाली पडून दोन प्रवाशांचा मृत्यू झाल्याच्या घटनांनी संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्र हादरले. यानंतर प्रशासनाने तातडीने हालचाली करत, प्रवाशांच्या दैनंदिन अडचणी लक्षात घेऊन रस्ते वाहतुकीचा प्रभावी पर्याय उभा करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार KDMTकडून प्रारंभी ४० आसनी दोन बस ठाणे–डोंबिवली–कल्याण या मुख्य मार्गावर धावणार असून, गर्दीच्या वेळेत (पीक अवर्स) प्रत्येकी चार फेऱ्या चालवण्यात येणार आहेत. सकाळ व संध्याकाळच्या अत्यंत गर्दीच्या वेळेत ही बससेवा प्रवाशांसाठी मोठा आधार ठरणार आहे.

**■ प्रवासी सुरक्षिततेला प्राधान्य**

KDMT प्रशासनाने या निर्णयामागे प्रवाशांचे प्राण वाचवणे आणि प्रवास अधिक सुरक्षित करणे हे सर्वोच्च उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट केले आहे. लोकलमध्ये चढताना-उतरताना होणारी चेंगराचेंगरी, उशिरा पोहोचण्याची धावपळ आणि अपघातांची भीती लक्षात घेता, बससेवा हा व्यवहार्य व सुरक्षित पर्याय ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

**■ इलेक्ट्रिक बसमुळे पर्यावरणपूरक प्रवास**

ठाणे महानगरपालिकेला केंद्र सरकारच्या पीएम ई-बस सेवा योजनेअंतर्गत ३०३ इलेक्ट्रिक बस मिळणार असून, त्यापैकी काही बस ठाणे–डोंबिवली मार्गावर धावणार आहेत. यामुळे केवळ लोकलवरील गर्दी कमी होणार नाही, तर प्रदूषणात घट होऊन पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूकही बळकट होणार आहे.

## पंतप्रधान मोदी आणि फ्रान्स राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन चर्चेनंतर

# भारत–फ्रान्स संबंधांना नवी ऊर्जा

**मुंबईः फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन मंगळवारी तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले. २०१७ मध्ये पदभार स्वीकारल्यानंतरचा हा त्यांचा चौथा दौरा आहे. राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई विमानतळावर मंगळवारी रात्री त्यांचे स्वागत केले. ते पंतप्रधान नरेंद्र मोदी मुंबईत भेट घेणार आहेत. दोन्ही नेते डसॉल्ट राफेल लढाऊ विमाने आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर (AI) चर्चा करणार आहेत. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे देखील आज मुंबई येथे आगमन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे स्नेहपूर्वक स्वागत केले. या प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्रीगण आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.**





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १७**
मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यात प्रतिनिधीमंडळ स्तरावरील चर्चा झाली. यानंतर दोन्ही नेत्यांनी कर्नाटकातील वेमगल येथे टाटा एअरबस H१२५ लाईट युटिलिटी हेलिकॉप्टर फायनल असेंब्ली सुविधेचे व्हर्च्युअल उद्घाटन केले. संयुक्त पत्रकार परिषदेत पंतप्रधान मोदी म्हणाले की भारत–फ्रान्स संबंध अत्यंत विशेष असून ही धोरणात्मक भागीदारी अभूतपूर्व पातळीवर पोहोचली आहे. H१२५ हेलिकॉप्टर प्रकल्पामुळे माउंट एव्हरेस्टच्या उंचीवर उडू शकणारे जगातील पहिले हेलिकॉप्टर तयार होणार असून ते जागतिक बाजारपेठेत निर्यात केले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या चर्चेमुळे संरक्षण, तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि औद्योगिक सहकार्याला नवी गती मिळणार असल्याचे दोन्ही देशांनी अधोरेखित केले. युरोपियन युनियनसोबत नुकत्याच झालेल्या मुक्त व्यापार करारामुळे भारत–फ्रान्स संबंधांना नवसंजीवनी मिळेल आणि संरक्षण, तंत्रज्ञान, नवोन्मेष व औद्योगिक सहकार्य अधिक बळकट होईल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.



# पूरपरिस्थितीपासून बदलापूरकरांची सुटका

## 230 कोटी रुपयांच्या स्ट्रॉम वॉटर प्रकल्पाचे भूमिपूजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १७**
**बदलापूर :** कुळगाव-बदलापूर नगरपरिषद अंतर्गत दुबेबाग, हेंद्रेपाडा, शनीनगर, मोहनानंद नगर तसेच कात्रप शिरगावपर्यंत मुख्य नाल्याच्या दोन्ही बाजूंना बांधकाम व खोलीकरण या महत्त्वपूर्ण पावसाचे पाणी व्यवस्थापन कामाचे भूमिपूजन आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते आज संपन्न झाले.

दरवर्षी पावसाळयात या परिसरात पाणी साचणे, नाले तुंबणे आणि नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागणे ही गंभीर समस्या होती. या पार्श्वभूमीवर या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी मुख्य नाल्याचे रुंदीकरण, खोलीकरण तसेच दोन्ही बाजूंना मजबूत बांधकाम करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

हे काम पूर्ण झाल्यानंतर पावसाचे पाणी जलदगतीने वाहून जाईल, पूरस्थितीवर नियंत्रण मिळेल आणि स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. तसेच परिसरातील स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणाच्या दृष्टीनेही या प्रकल्पाचा सकारात्मक परिणाम होणार आहे. विकासकामांच्या माध्यमातून बदलापूर शहराचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्याचा आमचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवणे ही आमची बांधिलकी आहे, असे आमदार किसन कथोरे यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमास नगराध्यक्षा सौ. रुचिता घोरपडे, उपनगराध्यक्षा सौ. प्रियांका दामले, मुख्याधिकारी मारुती गायकवाड, भाजपा गटनेते शरद तेली, शिवसेना गटनेते श्रीधर पाटील यांच्यासह सर्व सभापती, नगरसेवक, नगरपरिषदेचे पदाधिकारी, अधिकारी, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ठाणे महापालिकेच्या मालमत्तांवर केळकरांचा गंभीर आरोप

# आयुक्त सौरभ राव यांचे कार्यवाहीचे निर्देश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १७**
**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या शहरात विविध ठिकाणी अनेक मालमत्ता असून त्यापैकी अनेक मालमत्ता विविध संस्थांना देण्यात आल्या आहेत. मात्र, या संस्थांकडून संबंधित मालमत्तांचा व्यावसायिक वापर करून आर्थिक लाभ घेतला जात असल्याचे आरोप यापूर्वीपासून होत आहेत. हा मुद्दा आता भाजप आमदार संजय केळकर यांनी अधिकृतपणे उपस्थित करत महापालिकेच्या मालमत्तांचा भलत्याच पद्धतीने वापर होत असल्याचा आरोप केला आहे. यावर त्यांनी श्वेतपत्रिका काढण्याची मागणी केल्यानंतर महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले.




ठाणे महापालिकेच्या अनेक मालमत्ता शहराच्या विविध भागांत आहेत. काही वास्तू पालिकेला सुविधा भूखंडांच्या बदल्यात बिल्डरांकडून बांधून देण्यात आल्या आहेत. या मालमत्ता अनेक संस्थांना देण्यात आल्या असून त्या संस्थांकडून व्यावसायिक वापर करून पैसे कमावले जात असल्याचे आरोप सातत्याने होत आहेत.

दरम्यान, मंगळवारी आमदार संजय केळकर यांनी आयुक्त सौरभ राव यांची भेट घेत शहरातील विविध समस्यांवर चर्चा केली. यावेळी उपमहापौर कृष्णा पाटील, गटनेते मुकेश मोकाशी, नगरसेवक सुनेश जोशी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे तसेच सर्व विभागांचे उपायुक्त उपस्थित होते. याच बैठकीत केळकर यांनी महापालिकेच्या मालमत्तांचा मुद्दा ठामपणे मांडला. मालमत्ता विभागाकडे शहरात शेकडो मालमत्ता असून त्यांचा गैरवापर केला जात आहे. त्यांचे भाडेही वसूल केले जात आहे, असा गंभीर आरोप केळकर यांनी केला. या बळकावलेल्या मालमत्ता ताब्यात घेऊन संबंधितांना नोटिसा बजावाव्यात, तसेच मालमत्ता विभागाची सविस्तर श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली. यावर आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

# एमएमआरडीएच्या अर्थसंकल्पातून कल्याण मतदारसंघाला मोठा दिलासा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १७**
**अंबरनाथ :** कल्याण लोकसभा मतदारसंघातील वाहतूक पायाभूत सुविधांना मोठी चालना देणारा निर्णय मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण च्या २०२६-२७ या अर्थसंकल्पातून घेण्यात आला आहे. एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सादर झालेल्या अर्थसंकल्पात मेट्रो मार्गिका व प्रमुख रस्ते प्रकल्पांसाठी एकूण ४ हजार ८९७.१९ कोटी रुपये इतकी भरीव तरतूद करण्यात आली आहे. या निधीमुळे ठाणे परिसरापुरता मर्यादित राहिलेला मोठा पायाभूत विकास आता कल्याण लोकसभा मतदारसंघातही वेगाने विस्तारण्याची अपेक्षा आहे.

नुकत्याच सादर झालेल्या प्राधिकरणाच्या अर्थसंकल्पात ठाण्यापल्याडील अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांचा समावेश करण्यात आला असून कल्याण लोकसभा मतदारसंघातील महत्त्वाकांक्षी योजनांना प्राधान्य देण्यात आले आहे. मुंबईपासून सुरू होणारा हा मतदारसंघ थेट अंबरनाथपर्यंत विस्तारलेला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष लक्ष असलेला हा मतदारसंघ डॉ. श्रीकांत शिंदे यांचा आहे. गेल्या काही वर्षांत येथे मेट्रो, उन्नत मार्ग, रिंग रोड आदी अनेक प्रकल्प सुरू झाले असून नव्याने मंजूर झालेल्या निधीमुळे या प्रकल्पांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




**मेट्रो प्रकल्पांना गती**

- ठाणे ते भिवंडी आणि कल्याण अशी मार्गक्रमण करणारी मेट्रो-५ लवकरच धावणार आहे. या
- प्रकल्पाचा एक टप्पा दुर्गाडी ते उल्हासनगर आणि आता अंबरनाथपर्यंत विस्तारण्यात आला
- आहे. यातील मेट्रो ५ या ठाणे-भिवंडी-कल्याण साठी १ हजार ३०९.३० कोटी तर मेट्रो ५ अ साठी
- १८३.३५ कोटी अशी तरतूद करण्यात आली आहे. कल्याण ते तळोजा या कल्याण, डोंबिवली
- आणि ग्रामीण भागासाठी महत्वाच्या असलेल्या मेट्रोसाठी १.०५४.५४ कोटी रूपयांची तरतूद
- करण्यात आली आहे. तर कांजुरमार्ग ते बदलापूर या मेट्रो १४ मार्गासाठी ५०० कोटींची तरतूद
- करण्यात आली आहे. या प्रकल्पांमुळे कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर, बदलापूर
- आणि आसपासच्या वेगाने वाढणाऱ्या नागरी पट्ट्यांतील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार
- असून महानगराशी संपर्क अधिक वेगवान आणि सुलभ होणार आहे.




# भिवंडी महापालिकेत महापौर पदावरून रणकंदन

**मित्र पक्षांतच राजकीय संघर्षाची ठिणगी**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १७**
**ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील भिवंडी महापालिकेतील सत्तास्थापनेवरून दररोज नवनवीन घडामोडी समोर येत आहेत. ‘भिवंडी सेक्युलर फ्रंट’च्या माध्यमातून एकत्र येऊन महापौर पदावर दावा करणाऱ्या काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि समाजवादी पार्टी या तिन्ही पक्षांमध्ये मतभेद निर्माण झाल्याने त्यांचे राजकीय समीकरण बिघडले आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे गटाच्या शिवसेनेने शरद पवार गट, समाजवादी पार्टी, कोणार्क विकास आघाडी तसेच इतर पक्षांची मोट बांधत महापौर बसविण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. दरम्यान, आता भाजपनेही महापौर पदावर दावा करत त्यासाठी काँग्रेसच्या काही नगरसेवकांची मदत घेण्याच्या हालचाली सुरू केल्याचे वृत्त आहे. त्यामुळे भिवंडी महापालिकेत महापौर पदावरून शिंदे गटाची शिवसेना आणि भाजप या मित्र पक्षांमध्येच जुंपल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

भिवंडी महापालिकेत नगरसेवकांच्या एकूण ९० जागा असून या जागांसाठी ४३८ उमेदवारांनी निवडणूक लढविली होती. त्यापैकी ३४८ उमेदवारांचा पराभव झाला. निवडणुकीत भाजपचे २२, काँग्रेसचे ३०, शिवसेना (शिंदे गट) चे १२, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे १२, समाजवादी पार्टीचे ६, कोणार्क विकास आघाडीचे ४, भिवंडी विकास आघाडी (एकता मंच) चे ३ आणि १ अपक्ष असे एकूण ९० नगरसेवक निवडून आले आहेत. महापालिकेत सत्तास्थापनेसाठी ४६ नगरसेवकांचे बहुमत आवश्यक असताना एकाही पक्षाला हा जादुई आकडा गाठता आलेला नाही. त्यामुळे सत्तास्थापनेसाठी घोडेबाजार, फोडाफोडी आणि राजकीय हालचालींना आणखी वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# भूमिअभिलेख कर्मचाऱ्यांचा कामबंद आंदोलनाचा इशारा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १७**
**कल्याण :** शासनस्तरावर अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांची पूर्तता करण्यात होत असलेल्या चालढकलपणाच्या निषेधार्थ भूमिअभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांनी बुधवारपासून कामबंद आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. भूमिअभिलेख कर्मचारी कृती समिती महाराष्ट्र राज्य यांच्या पुढाकाराने हे आंदोलन राबविण्यात येणार असून येणाऱ्या पंधरा दिवसांच्या कालावधीत कामबंद, असहकार, काळ्या फिती लावणे, धरणे आंदोलन, आक्रोश मोर्चा अशा विविध माध्यमांतून शासनाचे लक्ष वेधले जाणार आहे.

भूमिअभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या मार्गी लावण्यासाठी विविध संघटनांच्या माध्यमातून शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला जात असला तरी त्याची दखल घेतली जात नसल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे.

> **मॅटच्या आदेशानुसार भूमिअभिलेख कर्मचाऱ्यांना तांत्रिक वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली नाही. दीडशे दिवसांच्या कृती कार्यक्रमात शासनाने दिलेली आश्वासनेही अद्याप पूर्ण झालेली नाहीत.**

मॅटच्या आदेशानुसार भूमिअभिलेख कर्मचाऱ्यांना तांत्रिक वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली नाही. तसेच दीडशे दिवसांच्या कृती कार्यक्रमात शासनाने दिलेली आश्वासनेही अद्याप पूर्ण झालेली नाहीत. कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांवर गदा आणून दबावतंत्राचा वापर करून काम करून घेतले जात असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

आम्हाला न्याय मिळत नसल्याने कामबंद व असहकार आंदोलनाचा मार्ग स्वीकारत आहोत, असे म्हणत भूमिअभिलेख कर्मचारी कृती समितीचे सुनील गोडसे, विभूतिचंद्र गजभिये, पवन केवटे, राहुल पाटील, किशोर इंगळे, दिलीप मुरकुटे, सुरज रामटेके, विवेक कोठाळे, कमलाकर पोतदार, संजय बोर्डे, अभय पाटील यांनी देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांना पाठवलेल्या पत्रात आपली भूमिका स्पष्ट केली आहे. दि. २ मार्चपर्यंत मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत कामबंद आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेने शासनाला दिला आहे.



# भिवंडी मनपा कर विभागाची आढावा बैठक




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमध्ये माहे नाव्हेंबर 2025 मध्ये कर वसुलीमध्ये वाढ होण्याकरिता अभय योजना लागू केली होती. या कालावधीमध्ये माहे नोव्हेंबर 2025 मध्ये 100%, माहे डिसेंबर 2025 मध्ये 75% तर उर्वरीत कालावधीसाठी 50% सुट देण्यात आली होती. माहे नोव्हेंबर व डिसेंबर 2025 मध्ये अभय योजनेस मिळालेला प्रतिसाद पहाता महानगरपालिकेने माहे फेब्रुवारी, 2026 पासुन पुनःश्च 100% व्याज माफी देण्याचा निर्णय घेतला आहे. याच अनुषंगाने मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से.) यांचे निर्देशानुसार मा. अतिरीक्त आयुक्त श्रीमती नयना ससाणे यांनी उपायुक्त (कर) श्री. बाळकृष्ण क्षिरसागर यांचे समवेत कर विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची आढावा बैठक दिनांक 13.02.2026 रोजी घेतली. याबैठकीमध्ये मा. अतिरीक्त आयुक्त श्रीमती नयना ससाणे यांनी एकूण मागणी, वसुल रक्कम व शिल्लक मागणी याचा सविस्तर आढावा घेतला. महानगरपालिकेने पुनःश्च 100% व्याज माफीची सवलत दिली आहे. त्याची जास्तीत जास्त माहिती थकबाकीदारांपर्यंत पोहचविण्यात यावी आणि 100% वसुली करावी अशा सक्त सुचना मा. अतिरीक्त आयुक्त यांनी कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत. तसेच, यापुढे प्रत्येक 15 दिवसांत वसुलीबाबत आढावा घेण्यात येईल. ज्या वसुली लिपीकांची वसुलीची टक्केवारी कमी असेल त्यांचेवर अत्यंत कठोर कारवाईचा ईशारा मा. अतिरीक्त आयुक्त, श्रीमती नयना ससाणे यांनी कर्मचाऱ्यांना दिला आहे.

या बैठकीस कर मुल्यांकन विभागाचे प्रमुख श्री. सुधीर गुरव, सर्व प्रभागाचे कर निरीक्षक, कर वसुली लिपीक हे उपस्थित होते.

# शहापूर तालुक्यातील स्मशानभूमी तीव्र कुपोषित अवस्थेत

## तीनशेच्यावर स्मशानभूमींची विदारक स्थिती उघड







**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुका हा कुपोषणात आघाडीवर असून दुर्दैवाने ही या तालुक्याची ओळख बनत चालली आहे. शेकडो बालके कुपोषित असल्याने त्यांचे जीव टांगणीवर आहेत, दुसरीकडे अशीच परिस्थिती दुर्गम भागातील स्मशानभूमीची झाली असून भ्रष्ट व निकृष्ट कामामुळे या स्मशानभूमी चे केवळ सागांडे शिल्लक राहिल्याचे चित्र चक्क ग्रामपंचायत कार्यालया समोरच दिसून येत असून, ३२७पेक्षा जास्त आदिवासी गाव पाड्यात स्मशानभूमी नाहीत.त्यामुळे आयुष्यभर पोटाची खळगी भरण्यासाठी झगडणा-या आदिवासी, गोरगरीब, कष्टकरी लोकांना शेवटच्या क्षणी/विसाव्यात स्मशानभूमी अभावी नरकयातना भोगाव्या लागत आहेत, यामुळे या परिसरात समृद्धी, विकास, विकासपर्व, वेगवान सरकार गतिमान निर्णय असे'गोंडस, बाळसेदार, शब्द, ऐकायला, बघायला, मिळत नाही. मुंबई शेजारी असलेल्या ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुका हा दुर्गम आदिवासी तालुका असून११०ग्राम पंचायतीमध्ये २२७ महसुली गावे ५१४ पाडे आहेत, येथे कुपोषणाची गंभीर समस्या आहे, एका अहवालानुसार सुमारे ७०० ते८०० हून अधिक बालके कुपोषित असून त्यापैकी ८० पेक्षा जास्त बालके तीव्र कुपोषित आहेत, ते मृत्यूशी झुंज देत आहेत. कुपोषणामुळे त्यांच्या शरीराचे सागांडे दिसत आहेत. येथील आदिवासी समाज पोटाची खळगी भरण्यासाठी इकडे तिकडे स्थलांतरित होत असतात, आयुष्यभर रोजगार, आरोग्य, शिक्षण, पाणी यासाठी वनवन भटकावे लागत असते, रस्ते, दिवाबत्ती, गटारे, असे काही असते हे यांना माहिती नाही. पण निदान शेवटच्या क्षणी स्वर्गाचा मार्ग सुकर व्हावा, मोक्ष मिळावा, वैकुंठ प्राप्त व्हावा, अशी माफक अपेक्षा यांची असते, परंतु तेही यांच्या नशिबी आहे असे वाटत नाही, कारण विसावा, शेवटचे ठिकाण असलेली मसणवाट, स्मशानभूमीत केवळ सांगाडे उरलेले आहे, तुटलेले, लटकलेले, सडलेले, पत्रे, चौथरा, खांबाभोवती उगलेले गवत, झाडेझुडपे, बैठक व्यवस्थेचा अभाव, उखडलेल्या लाद्या, सावली नाही, पाणी नाही, यामुळे पावसाळ्यात छत्री, प्लास्टिक मृतदेहावर धरून अंत्यसंस्कार करावे लागतात तर उन्हाळ्यात झाडं असतील तेथे बसून अखेरचा निरोप दिला जातो,

अशीच स्थिती सध्या या तालुक्यात दिसून येत आहे, शहापूर तालुक्यात३२७पेक्षा जास्त आदिवासी गाव पाड्यात स्मशानभूमि नाही,१९७स्मशानभूमी आरसीसी आहेत तर २३१ सुस्थितीत आहेत.त्यामुळे वाटचुकलेला'विकास, कुठे भेटला तर आमच्या वाड्या वसत्यावर पाठवा असे आदिवासी तरुण सांगत आहेत.

## जिल्हास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत

# जि. प. पेंढरी शाळा जिल्ह्यात पहिली

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**




**मुरबाड(दिलीप पवार)** : दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा पेंढरी या शाळेने विविध गुणदर्शन स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे.या स्पर्धेत या शाळेने उत्तराखंड मधील अहिर न्यूत्याचे सर्वोत्कृष्ट सादरीकरण करून सर्वांचे मन जिंकून जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान मिळविला .

विविध गुणदर्शन स्पर्धेसाठी ठाणे जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे,कल्याण तालुका गटशिक्षणाधिकारी मोटघरे मॅडम,शिक्षणविस्तार अधिकारी आशिष झुंजारराव ई. उपस्थित होते.इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंतच्या या चिमुकल्यांवर तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शाळेच्या वरिष्ठ शिक्षिका श्रीमती नलिनी नंदकुमार ईसामे मॅडम,सहशिक्षक संदीपान अर्जुन बडे यांच्यावर तालुक्यातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.शाळेच्या वरीष्ठ शिक्षिका या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांबरोबर त्यांना मार्गदर्शन करणारे मुरबाड तालुका गटशिक्षणाधिकारी श्री. मधुकर घोरड ,केंद्रप्रमुख संजय देशमुख,शाळा व्यवस्थापन समिती पेंढरी ,वाघवाडी ,उंबरवाडी,ग्रामस्थ व पालकवर्ग यांना देत असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले.इ.१ली ते ५ वी पर्यंत असलेली शाळा सातत्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबवत असते, महिलांना आरोग्य मार्गदर्शन,भोंडला, मतदान जागृती, दहिहंडी,शैक्षणिक सहल, शिष्यवृत्ती, मंथन परिक्षा मार्गदर्शन, स्वच्छ व सुंदर शाळा असे उपक्रम राबवून हि शाळा तालुक्यात आपला ठसा उमटवून आहे.

> **माझ्या बाल चिमुकल्यांच्या या यशाचा मला खूपच आनंद आणि अभिमान आहे यासाठी मला ज्यांचे सहकार्य लाभले ते सहशिक्षक संदिपान बडे मार्गदर्शक गटशिक्षणाधिकारी , ग्रामस्थ, smc ,पालकवर्ग या सर्वांची मी खूप आभारी आहे**
>
> **- नलिनी नंदकुमार ईसामे (वरिष्ठ शिक्षिका पेंढरी शाळा)**

# मायणी कोयना शाळेचा अभिनव उपक्रम

# ए.आर. तंत्रज्ञानातून वर्गात 'प्राण्यांचे सजीव दर्शन'

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**





**पेण** : पेण तालुक्यातील गागोदे केंद्रातील मायणी कोयना शाळेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांसाठी एक नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आला. ए.आर. तंत्रज्ञानाच्या साह्याने विविध प्राणी थेट वर्गातच सजीव स्वरूपात दाखविण्यात आले. या अनोख्या प्रयोगामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्सुकता व आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या उपक्रमामध्ये मोबाईलच्या कॅमेऱ्याच्या माध्यमातून त्रिमितीय (3D) स्वरूपातील प्राणी विद्यार्थ्यांसमोर प्रत्यक्ष उभे असल्याचा अनुभव देण्यात आला. सिंह, हत्ती, जिराफ, बदक, पेंग्विन, ससा तसेच डायनासोर यांसारख्या प्राण्यांचे आकार, हालचाली आणि वैशिष्ट्ये विद्यार्थ्यांनी अगदी जवळून पाहिल्याने त्यांच्या आकलनशक्तीत मोठी वाढ झाली. शाळेचे मुख्याध्यापक रामकृष्ण भोईर यांनी सांगितले की, पारंपरिक पाठ्यपुस्तकातील चित्रांपेक्षा अशा डिजिटल माध्यमातून शिकविल्यास विद्यार्थ्यांना विषय अधिक स्पष्टपणे समजतो. विज्ञान, पर्यावरण आणि सामान्य ज्ञान या विषयांबद्दल विद्यार्थ्यांची जिज्ञासा वाढविण्यास हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला. विद्यार्थ्यांनीही या तंत्रज्ञानाचा अनुभव घेताना "जणू प्राणी वर्गातच आले आहेत" अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. प्रत्यक्ष निरीक्षणाचा अनुभव मिळाल्यामुळे शिकणे अधिक रंजक आणि कायम स्मरणात राहणारे झाले. शाळेने नेहमीच नाविन्यपूर्ण शैक्षणिक प्रयोगांना प्राधान्य दिले असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा हा एक प्रभावी प्रयत्न असल्याचे प्रतिपादन गागोदे केंद्राचे केंद्रप्रमुख दत्तात्रेय कोठेकर यांनी केले. भविष्यातही अशा डिजिटल आणि अनुभवाधारित शिक्षणपद्धती राबविण्याचा मानस यावेळी शाळेतील शिक्षक अमित महागावकर व मंगेश पाटील यांनी व्यक्त करण्यात आला. या अभिनव उपक्रमाचे पालक व ग्रामस्थांकडूनही कौतुक होत असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणारे हे एक प्रेरणादायी पाऊल ठरत आहे.

# दुबई येथे आखाती देशातील भव्य शिवजयंती साजरी करत रोवला अटकेपार झेंडा




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** मराठी माणूस देशात असुदे की परदेशात महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांना विसरुच शकत नाही. स्वराज्य स्थापन करून गरीब जनतेची सेवा करणारा जगप्रसिद्ध राजा अशी ख्याती असणाऱ्या श्रीमंत छत्रपतींची जयंती आखातामधील यूएई मध्ये रविवारी साजरी करण्यात आली. या भव्य आयोजनाचे हे ८ व वर्ष होते व दुबईतील ग्लेंडल इंटरनॅशनल स्कूल याठिकाणी करण्यात आले. आयोजकांच्या धाडसी प्रयत्नाला शुभेच्छा देण्यासाठी यंदाचे प्रमुख पाहुणे ॲड. जया सामंत महाराष्ट्रातून उपस्थित होत्या.

आखातात स्थायिक झालेल्या नवीन मराठी पिढीला आपल्या महाराष्ट्राच्या दैदिपयमान इतिहासाची ओळख करून देण्यासाठी आतापर्यंत अनेक सामाजिक कार्यक्रम पार पाडणाऱ्या ईन्स्पायर इव्हेंट्स युएई यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमा अंतर्गत महाराष्ट्राची लोककला, लेझीम यासारखे सांस्कृतिक कार्यक्रम आंतरराष्ट्रीय पातळीवर सादर करण्यात आले. श्रीमंत ढोल ताशा पथक यूएई च्या सहकार्यानी भव्य असे ढोल ताशा वादन करण्यात आले. या कार्यक्रमास दुबईतील उद्योजक व समाजसेवी संघटणानी सहकार्य केले.यंदा च्या शिवजयंती उत्सवाचे खास आकर्षण म्हणजे शिवभक्त कोकण नमन मंडळ यांचं कोकणातील लोककला नमन यांचे अप्रतिम सादरीकरण ठरले. महाराष्ट्रातील २०हून अधिक कोकणी कलाकार या सादरनीकरणात सामील झाले. युएईतील १००० हुन अधिक मराठी व आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेतला व कार्यक्रमात मोठ्या उत्साहात सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढविली. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आयोजक चंद्रशेखर जाधव,चैताली जाधव व इतर सर्व सहकार्यांनी अथक मेहनत घेऊन भव्य शिवजयंती साजरी केली व अटकेपार झेंडा आंतरराष्ट्रीय पातळीवर फडकवला.

# टुर निघाली दापोलीला

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**




**गेली ५० वर्षाची महिला सहलिची परंपरा आज ही सुरु ठेवल्याने वैश्य समाजा कडून वैश्य पदाधिका-यांचे कौतूक**

**वाशिंद** : ठाणे पालघर जिल्हा महाराष्ट्र वैश्य समाज संघाच्या वतीने आयोजीत केलेल्या महिला सहला सहल आज दापोलीला रवाना झाली असी माहीती वैश्य समाजाचे अध्यक्ष निलेश गंध्ये यांनी दिली. शहापूर येथे नगरसेविका मिताली भोपतराव व मंगला गुजरे यांनी हिरवा झेंडा दाखवून हि सहल रवाना झाली.

गेली ५० वर्षाची महिला सहलिची परंपरा आज ही सुरु ठेवल्याने वैश्य समाजा कडून वैश्य पदाधिका-यांचे कौतूक होत आहे. महिला सहल असल्याने या सहलीचे नियोजन महिला पदाधिकारी स्रीप्रतिनीधी पुजा काबाडी, उपस्रिप्रतिनीधी मयूरी तोंडलीकर, सास्क्रुतीक समिती सभापती नाजूका गुजरे, महेश सिगांसणे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. तर या सहलित कौणतीही तात्रीक अडचण येऊ नये म्हणून वैश्य समाजाचे अध्यक्ष निलेश गंध्ये, समन्वय समिती प्रमुख दिलिप भोपतराव, उपाध्यक्ष प्रितेश जगे, उपाध्यक्ष निलेश कोंडलेकर,विस्वस्थ प्रमुख सावित्री आंबवणे,, विश्वस्थ दिलीप पातकर,रूपेश पुन्यार्थी ,सुशिल पातकर, सल्लागर रोमा अळशी, नंदकिशोर मलबारी, अमित चौधरी,सह चिटनिस पंकज जगे ,यांचे नियोजन आहे. या सहलिस १६२ महिला असभागी झाल्या आहेत. ५० वर्षात प्रथमच एसी बस प्रवासासाठी असल्याने सहभागी झालेल्या महिलांनी कमीटीचे कौतूक केले आहे. दापोली परिसरातील निसर्गा बरोबरच समुद्र किनाराचे आनंद घेता येणार असल्याने महिलांच्या चेहे-यावरील हसू दिसून येत होते. सोमवार दि. १६ फेब्रुवारी रोजी कल्याण येथून रात्री १० वाजता गणेशाचे दर्शन घेऊन १६२ महिलांना घेऊन दापोली कडे महिला टूर रवाना झाली.

# सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेतील मंडळांचा गौरव व पारितोषिक वितरण कार्यक्रम







**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा-2025 स्पर्धेत जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक श्री युवा मित्र मंडळ, पनवेल, नवी मुंबई (पारितोषिक रक्कमः रु. 40000/-), तृतीय क्रमांकः सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट, रोहा, रायगड (पारितोषिक रक्कमः रु.30000/-) यांचा जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते गौरव व पारितोषिक वितरण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, जिल्हा नियोजन अधिकारी उमेश सुर्यवंशी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार, राज्यातील सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत राज्यातील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची निवड करण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धा पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या वतीने राबविण्यात आल्या होत्या.

ही स्पर्धा तालुका, जिल्हा आणि राज्य अशा तीन स्तरांवर राबविण्यात आली होती. मंडळांची निवड करताना कला व संस्कृतीः पारंपरिक कलांचे (गायन, वादन, नृत्य इ.) आयोजन आणि दुर्मीळ वस्तूंचे प्रदर्शन, सामाजिक कार्यः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी राबविलेले उपक्रम पर्यावरण पूरक गणेशोत्सवः प्रदूषण विरहित परिसर, पर्यावरणपूरक मूर्ती आणि सजावट निसर्ग जतनः गडकिल्ले संवर्धन आणि स्वच्छतेबाबत केलेली जनजागृती या प्रमुख निकषांचा विचार करण्यात आला होता.

जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक संत रोहिदास तरुण विकास मंडळ, महाड (पारितोषिक रक्कमः रु. 50,000/-). हे राज्य स्तरावरील मुख्य कार्यक्रमात प्रदान करण्यात आले आहे.

# भविष्यवेध



**बुधवार**

**१८ फेब्रुवारी २०२६**

**मेष**
आवश्यक गोष्टी व्यवस्थित ठेवा जेणेकरून गरज पडल्यास तुम्हाला कोणाकडेही मागावे लागणार नाही. कौटुंबिक जीवनात सुसंवाद राहील.

**वृषभ**
एखादे काम पूर्ण करण्यासाठी नवीन पद्धती वापरून पाहू शकता. ऑफिसमध्ये सहकाऱ्यांसोबत नवीन प्रकल्पावर चर्चा करू शकता. कंपनीला फायदा होईल.

**मिथुन**
कुटुंबासोबत आनंदात वेळ घालवण्याचा अनुभव खूप छान असेल. कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण होईल. प्रलंबित कामे पूर्ण कराल.

**कर्क**
नवीन ध्येयेही निश्चित कराल. जर इतरांवर अवलंबून राहण्याऐवजी मेहनतीवर आणि क्षमतेवर विश्वास ठेवलात तर गोष्टी सुरळीत होतील.

**सिंह**
जोडीदारासोबत चित्रपट पाहण्याची योजना कराल, ज्यामुळे नाते सुधारेल. व्यवसाय सुरळीत सुरू राहतील आणि जुन्या ग्राहकांकडून आर्थिक नफा मिळेल.

**कन्या**
दिवसाच्या सुरुवातीला काही गोंधळ होऊ शकतो, परंतु कुटुंबाच्या मदतीने सर्वकाही सोडवले जाईल. योजनेवर काम केल्याने चांगले परिणाम मिळू शकतात.

**तुळ**
मेहनतीचे पूर्ण फळ तुम्हाला मिळेल आणि तुम्ही जे काही हाती घ्याल ते यशस्वी होईल. तुमच्या ड्रेसिंग सेन्सची ऑफिसमध्ये प्रशंसा होईल.

**वृश्चिक**
अभ्यासासाठी आणि करिअरसाठी अधिक मेहनत करण्याची आवश्यकता आहे.. कोणतेही काम हाती घेण्यापूर्वी, रोजगाराच्या संधी मिळतील.

**धनु**
परिश्रम आणि समर्पणाने एखादे काम लवकर पूर्ण कराल. भविष्यात तुम्हाला लक्षणीय आर्थिक लाभ होतील. तुमचे वैवाहिक जीवन आज आनंदी राहील.

**मकर**
बदलत्या हवामानात, आरोग्याची काळजी घ्या आणि तळलेले पदार्थ टाळा. ऑफिसमधील कर्मचाऱ्यांसोबत व्यवसायाबाबत बैठक घेऊ शकता.

**कुंभ**
कामाची गुणवत्ता सुधारण्यावर लक्ष केंद्रित करू शकता. कुटुंबासाठी वेळ काढल्याने नातेसंबंध मजबूत होतील आणि आनंदी वातावरण निर्माण होईल.

**मीन**
भविष्यासाठी नवीन ध्येये निश्चित कराल. वैवाहिक जीवन आज आनंदी राहील आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका. नकारात्मक लोकांपासून अंतर ठेवा.




## उपविभागीय अधिकारी कल्याण, उपविभाग कल्याण यांचे समोरील कामकाज

**दि.११/०२/२०२६**
**आरटीएस अपिल २१६/२०२५**

### जाहीर नोटीस

१. गुरुदास कृष्णा पाटील मयत तर्फे वारस
रंजिता गुरुदास पाटील विवाहानंतरचे नाव रंजिता बाळाराम जाधव
रा. पलावा फेज ०२, डॉउन टॉउन गेट नं. ४, इ विवा, एल विंग, फ्लॅट नं. ९०२, ठाणे ..............(अपिलार्थी)

विरुध्द

| | |
|---|---|
| गुरुदास कृष्णा पाटील मयत तर्फे वारस | ७. देवानंद कृष्णा पाटील |
| १. शारदा गुरुदास पाटील | ८. अभिमन्यु कृष्णा पाटील |
| २. सुजाता गुरुदास पाटील | ९. पंढरीनाथ कृष्णा पाटील |
| ३. अमित गुरुदास पाटील | रा. काळेगाव, ता. कल्याण, जि. ठाणे |
| ४. अनिता गुरुदास पाटील | १०. तलाठी सजा हेदुटणे |
| ५. आकाश गुरुदास पाटील | ता. कल्याण, जि. ठाणे |
| रा. कोळेगाव, ता. कल्याण, जि. ठाणे | ११. मंडळ अधिकारी अप्पर कल्याण |
| ६. यज्ञेश्वर कृष्णा पाटील | ता.कल्याण, जि.ठाणे ---(उत्तरार्थी) |

ज्याअर्थी, अपिलार्थी यांनी मौजे कोळे, ता.कल्याण, जि.ठाणे येथील उपरोक्त नमुद मिळकतीसंदर्भात फेरफार क्र. ९१७ व १००५ च्या नोंदीविरुद्ध प्रकरण दाखल केलेले आहे. सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी कल्याण, उपविभाग कल्याण यांचे न्यायालयात आरटीएस अपिल २१६/२०२५ अन्वये सुनावणी सुरु आहे. तरी सदरहू प्रकरणी कार्यवाहीकामी तुम्हांस (शारदा गुरुदास पाटील व इतर) उत्तरार्थी म्हणून सामील केलेले आहे. सबब, तुम्हांस या अपिलाचे समन्स काढले असता सदरचे समन्स न बजावता परत आले आहे..

तरी तुम्हांस या नोटीसने सुचित करण्यात येते की, तुम्ही उत्तरार्थी (शारदा गुरुदास पाटील व इतर) यांनी कल्याण येथील उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयात आरटीएस अपिल २१६/२०२५ प्रकरणी पुढील सुनावणी दि.०२/०३/२०२६ रोजी नेमलेली असून तुम्ही उत्तरार्थी उपविभागीय अधिकारी कल्याण उपविभाग कल्याण यांचे न्यायालयात सकाळी ११.०० वा. समक्ष जातीने हजर राहावे अथवा सदर प्रकरणी आपले म्हणणे दाखल करावे. याप्रमाणे दि.०२/०३/२०२६ रोजी नेमलेल्या तारखेस तुम्ही गैरहजर राहिल्यास अथवा तुमचेतर्फे लेखी जवाब दाखल करण्यास चुकल्यास सदर अपिलासंबंधी तुम्हाला काही सांगावयाचे नाही असे समजून तुमच्या गैरहजेरीमध्ये अपिलाचा एकतर्फी निकाल केला जाईल व त्या संबंधीची तुमची तक्रार नंतर ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही /-**
**(कविता देशमुख**
**नायब तहसिलदार**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय कल्याण**
**उपविभाग कल्याण**
**पत्ता : मोहन प्राईड, सांस्कृतिक कल्याण केंद्र, दुसरा मजला, पोतदार स्कूलजवळ खडकपाडा, कल्याण प., जि.ठाणे**



## ठाणे महानगरपालिका, ठाणे

(सा. बां. विभाग)
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये ``मागासवर्गीय निधी`` या लेखाशिर्षांतर्गत १) प्रभाग क्र. ३ (अ) मधील मनोरमानगर (बाळकूम) पाटील चाळ येथील शौचालयात व परिसरात विविध स्थापत्य कामे करणे, २) प्र.क्र. ३ (अ) मधील मनोरमानगर (बाळकूम) जिवन संग्राम चाळ परिसरात गटारे व पायवाटा करणे अशा एकुण दोन (०२) कामाकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा प्रक्रीयेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगर पालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत / काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावीत आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे दि. १८/०२/२०२६ ते दि. २५/०२/२०२६ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा संकेतस्थळ येथे दि. २५/०२/२०२६ पर्यंत १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दि. २६/०२/२०२६ रोजी १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/सा.बा-मा.मा.प्र.स/१२०२/२०२५-२६ सही/-
दि:१७.०२.२०२६ कार्यकारी अभियंता
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in

**अनाधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनाधिकत बांधकाम दिल्यास प्रभाग समितीत तक्रार करा!**


## वालधुनी नदीत थेट भुयारी गटार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर** : शहरात भुयारी गटार योजनेंतर्गत गटाराचे पाइप वालधुनी नदीच्या पात्रात टाकण्यात येत आहे. या पाइपांमुळे नदीचे पात्र अरुंद व उथळ होऊन पावसाळ्यात पुराचा फटका नदी किनाऱ्यावरील हजारो नागरिकांना बसण्याची भीती समाजसेवक शिवाजी रगडे यांनी व्यक्त केली आहे. याबाबत महापौरांना तसे निवेदन दिले आहे.

नदीच्या पुराचा फटका किनाऱ्यावरील नागरिकांना बसू नये म्हणून संरक्षक भिंतीची मागणी होत आहे, तर दुसरीकडे, भुयारी गटार योजनेमुळे पाइप थेट वालधुनी पात्रात टाकण्यात येत आहे. त्यामुळे पुराचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, महापालिकेच्या या कामामुळे नदीकाठच्या अनधिकृत बांधकामधारकांना मोकळे रान मिळत असल्याचा गंभीर आरोप पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांनी केला आहे.


## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**भिवंडी.जि.ठाणे.**
**पाणी पुरवठा विभाग**

**ई - निवीदा सुचना क्रमांक ४८ (पहिल्यांदा प्रसिध्दी) सन २०२५-२६**

**खालील काम करण्याकरीता सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून ई निविदा मागविण्यात येत आहे.**

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | अंदाजित खर्च | निविदा फॉर्म फी | निविदा विक्री व स्विकारण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | मा. आमदारांचा स्थानिक विकास कार्यकम २०२५-२०२६ भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग क्र. ०१ मध्ये कोंबडपाडा येथील कोळेकर चौक जवळील लक्ष्मी दर्शन बिल्डींग येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे बाबत.सन २०२५-२६ या. | रु. ५,९९,९९९/- | रु. २३६०/- | दि. १८/०२/२०२६ ते दि. २५/०२/२०२६ |
| २ | मा. आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम २०२५-२०२६ भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग क्र.०१ मध्ये विविध ठिकाणी नवीन पाईपलाईन टाकणे व बुस्टरपंप बसविणेबाबत. (संगमपाडा, कासारआळी, कोंबडपाडा, वरचापाडा)सन २०२५-२६ या. | रु. ९,९९,६९२/- | रु. २३६०/- | |
| | सदर निविदा बाबतची माहिती मनपा संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in वर दिनांक १८/०२/२०२६ पासुन उपलब्ध आहे. | | | |

**जा.क्र./ज.सं.वि./१४८**
**दि. १७/०२/२०२६**

**सही /-**
**प्र.कार्यकारी अभियंता,**
**पाणी पुरवठा विभाग**
**भिवंडी नि. शहर महानगरपालिका भिवंडी.**


## ठाणे महानगरपालिकेच्या वाहनचालकाचे मद्यप्राशन प्रकरणी तात्काळ निलंबन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या कार्यशाळा विभागातील वाहनचालक सतीष बळीराम तेटवार याला कर्तव्यावर असताना मद्य प्राशन केल्याप्रकरणी ठाणे महापालिकेच्या सेवेतून तात्काळ निलंबित करण्यात आले आहे

आज ठाणे महानगरपालिकेच्या कार्यशाळा विभागातील वाहनचालक सतीष बळीराम टेटवार तसेच खाजगी वाहनचालक विपुल भरत बनकर हे वाहन क्रमांक MH 04 KU 2323 मध्ये कार्यालयीन वेळेत मद्यप्राशन करत असल्याचे निदर्शनास आले.

प्रशासनाने या घटनेची तात्काळ दखल घेत संबंधित दोन्ही वाहनचालकांना तपासणीसाठी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे पाठविले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीत दोघांनीही मद्यप्राशन केल्याचे स्पष्ट झाल्याचा अहवाल देण्यात आला आहे.

सदर प्रकार अत्यंत गंभीर मानून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 अन्वये सतीष बळीराम टेटवार या वाहनचालकाला आज दिनांक 16 फेब्रुवारी 2026 रोजीच्या प्रभावाने तात्काळ सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तर विपुल भरत बनकर हा खाजगी वाहनचालक असल्याने त्याबाबतची माहिती पोलीस प्रशासनास कळविण्यात आली असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## ठाण्यात अवयवदान चळवळीला वेग

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे(प्रशांत घोडविंदे) :** ठाणे परिमंडळात अवयवदान चळवळीने महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. प्रशासन, अवयव प्रत्यारोपण केंद्रे आणि समन्वय यंत्रणेच्या तत्पर कार्यपद्धतीमुळे अवयवदान प्रक्रियेला गती मिळाली. आरोग्य सेवा, मुंबई मंडळाचे उपसंचालक डॉ. अशोक नांदापूरकर यांच्या मार्गदर्शनात झालेल्या सत्रात आरोग्य मंत्र्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. सचिन जाधव, सहायक संचालक डॉ. अभिजित फडणीस, डॉ. एस. के. माथुर, डॉ. भरत शहा आदी यावेळी उपस्थित होते. या वेळी मान्यवरांनी रुग्णालयांना अवयवदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.

### दुकानात बाल कामगार कामावर ठेवल्याने
## भिवंडीत तीन दुकान मालकावर गुन्हा दाखल

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**राज्यामध्ये कापड उद्योगाची नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भिवंडी शहर परिसरात मोठ्या संख्येने परराज्यातून नागरिक येत आहे.रोजगार मिळण्याच्या आशेने येणाऱ्या या नागरिकांना अपेक्षित असा रोजगार न मिळाल्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे अनेक कुटुंबातील सदस्य हे स्वतः व आपल्या लहान मुलांना हॉटेल, बियर बार, यंत्रमाग कारखाने अशा विविध ठिकाणी काम करण्यासाठी पाठवीत आहेत, केंद्र व राज्य शासन आदेशानुसार बालकामगारांना कामावर ठेवू नये असे आदेश असताना हॉटेलमध्ये व इतर ठिकाणी कमी मोबदल्यात बालकामगारांना नोकरीसाठी ठेवले जात आहे.अनेक ठिकाणी इमारतीचे बांधकाम सुरू आहेत तेथे सुद्धा रोजगार मिळेल या आशेने बालकामगार काम करीत आहेत राज्य शासनाने याबाबत गंभीर दखल घेऊन बालकामगार चे कमी मोबदल्यात जास्त काम करून घेणाऱ्या या मालकांवर कारवाई करावी अशी मागणी पीपल्स रिपब्लिकन पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.**

**भिवंडी** : भिवंडीतील सहा.कामगार आयुक्त आणि कामगार अधिकारी कार्यालयाने दुर्लक्ष केल्याने आता स्थानीक पोलिसांनी बाल कामगारांचे शोषण करणाऱ्यावर ठोस कारवाई करीत तीन मालकांवर गुन्हा दाखल केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे.

भिवंडी- ठाणे-नाशिक मार्गावरील रांजणोली येथे गुप्ता डोसा हॉटेल मध्ये कमी मोबदल्यात जास्त श्रमाची कामे करून घेत अल्पवयीन मुलास चुकीची वागणूक दिल्या प्रकरणी हॉटेल मालक बबलूकुमार डोमनसाव सिंग (२८) यांच्या विरोधात कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तसेच भंडारी कंपाउंड मधील युनूस चिकन शॉप या दुकानात ८ वर्षाच्या मुलास कमी मोबल्यात जास्त मोबदल्याची कामे करवून घेणाऱ्या मालक मोह. युनूस मोह.अली कुरेशी यांच्या विरोधात नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तर बालाजी कंपाऊन्ड मधील बर्मा भोजनालय मध्ये १२ वर्षाच्या मुलाकडून श्रमाची कामे करून घेतल्याने मालक संजय जयकरण वर्मा याच्या विरोधात नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## आरोग्य सेवेसाठी आशा वर्कर्स यांचे योगदान अमूल्य
### : महापौर शर्मिला पिंपळोलकर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (16)** : तळागाळात जाऊन वर्षानुवर्षे लोकसेवा आणि रुग्णसेवा बजावणाऱ्या आशा वर्कर्स या आरोग्यव्यवस्थेचा कणा आहेत, त्यांचे योगदान हे अमूल्य असल्याचे वक्तव्य महापौर शर्मिला पिंपळोलकर येथे केले. आज ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे विशेष सन्मान करण्यात आला. संशयित क्षयरुग्णांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करताना अपेक्षेपेक्षा अधिक कामगिरी करणाऱ्या प्रतिनिधीक स्वरुपात 20 आशा वर्कर्सना महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि उपमहापौर कृष्णा पाटील यांच्या हस्ते गौरविण्यात आले.




ठाणे महानगरपालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात आयोजित कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. स्वप्नाली कदम यांसह आरोग्य विभागातील अधिकारी उपस्थित होते.

घराघरांत जाऊन नागरिकांशी संवाद साधत, आरोग्य तपासणीसाठी प्रोत्साहन देत आणि आजारांबाबत जनजागृती करत आशा वर्कर्स आरोग्य यंत्रणेचा भक्कम आधारस्तंभ ठरत आहेत. संशयित क्षयरुग्ण शोधून त्यांची नोंदणी करणे ही अत्यंत जबाबदारीची भूमिका त्यांनी प्रभावीपणे पार पाडली आहे. अनेक आशा वर्कर्सनी निर्धारित उद्दिष्टांपेक्षा जास्त रुग्णांची नोंदणी करून आपली कर्तव्यनिष्ठा सिद्ध केली असल्याचे महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी नमूद केले. तर उपमहापौर कृष्णा पाटील यांनी देखील आशा वर्कर्सच्या कामाचे कौतुक करीत ठाणे महापालिका त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले.

तर प्रास्ताविकपर भाषणात मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांनी आशा वर्कर्सच्या कामाचे कौतुक केले. संशयित क्षयरुग्णाच्या नोंदणी कामात आशांनी सक्रिय सहभागी घेतला. तसेच 10 दिवसांत 150 जणांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट दिले असताना हजारहून अधिक संशयित रुग्णांची नोंदणी त्यांनी केली, त्यामुळेच त्यांचा सन्मान करण्यात आला असल्याचे त्यांनी नमूद केले.

महानगर गॅस लि. कडून रु.1.25 कोटींचा निधी

महानगर गॅस लिमिटेड यांनी ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागासाठी रु 1.25 कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे दोन ॲडव्हान्स सोनोग्राफी मशीन आणि एक 2D इको मशीन उपलब्ध करण्यात आली आहे. या अत्याधुनिक यंत्रसामग्रीचे लोकार्पण महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते करण्यात आले. रेडिओलॉजी विभागाचे बळकटीकरण करण्यासाठी या मशीन महत्त्वपूर्ण ठरणार असून विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू रुग्णांना याचा मोठा फायदा होणार आहे. अत्याधुनिक तपासण्या स्थानिक पातळीवर उपलब्ध झाल्याने रुग्णांचा वेळ आणि खर्च दोन्ही वाचणार आहेत.

'हिंद दी चादर' शहीदी समागम शताब्दीनिमित्त फलकाचे अनावरण

यावेळी 'हिंद दी चादर' म्हणून ओळखले जाणारे शीख धर्मातील नववे गुरु गुरूतेग बहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शहीदी समागम शताब्दीनिमित्तच्या कार्यक्रमाच्या फलकाचे अनावरणही महापौरांच्या हस्ते करण्यात आले. गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवतेच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान आजही समाजाला प्रेरणा देणारे आहे. या शताब्दी वर्षानिमित्त आरोग्य विभागाच्या माध्यमातून सर्व आरोग्य केंद्रात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांनी नमूद केले.

## 'मानसिक तणाव जागतिक समस्या'

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** जगभरात मानसिक तणावामुळे दरवर्षी सुमारे एक ट्रिलियन डॉलरचे आर्थिक नुकसान होत आहे. धावपळीच्या आणि स्पर्धेच्या युगात वाढता मानसिक तणाव ही जागतिक समस्या बनली आहे. शारीरिक आरोग्याइतकेच मानसिक आरोग्य जपण्यासाठी अध्यात्म आणि शाश्वत जीवनशैलीचा अवलंब करणे काळाची गरज आहे, असे आवाहन गोवर्धन इकोव्हिलेजचे संचालक गौरांग दास यांनी 'तणावमुक्ती आणि आनंदी जीवनाची गुरुकिल्ली' या विषयावर बोलताना केले. ठाणे पालिका आणि इस्कॉन ठाणे यांच्या वतीने विशेष व्याख्यान झाले. महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील, पालिका आयुक्त सौरभराव, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त जी. जी. गोदेपुरे उपस्थित होते.

## पारमिता धर्मदाय न्यास कल्याण, यांच्यातर्फे गुणवंतांचा सत्कार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण पश्चिम येथील पारमिता धर्मादाय न्यासाचा "१५वा वर्धापन दिन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार" ब्राह्मण सभागृह, ब्राह्मण सोसायटी, कल्याण पश्चिम येथे रविवारी करण्यात आला. वर्धापनदिनाच्या कार्यक्रमासाठी डिजीक्लाउड टेक्नॉलॉजीज सीएफओ आणि सीएचआरओ डॉ. संतोषकुमार फुलपगार प्रमुख पाहुणे तर सोनवणे महाविद्यालय, कल्याण येथील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ अनुप्रिया खोब्रागडे प्रमुख वक्त्या म्हणून लाभले होते. त्याप्रसंगी न्यासाचे अध्यक्ष बालकदास मेश्राम, सचिव मधुसूदन राऊत, खजिनदार ॲड. अनिल मेश्राम मंचकावर विराजमान होते.

सुरुवातीला तथागत गौतम बुद्ध आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या



प्रतिमांना पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण व दिप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर माया शेंडे, संध्या डोंगरे, ललिता राऊत, रेखा मेश्राम, भूमिका मेश्राम यांनी त्रिशरण, पंचशील व बुद्ध वंदना घेतल्यानंतर कार्यक्रमाची सुरुवात झाली. सुरुवातीला न्यासाचे माजी अध्यक्ष नामदेव शेंडे यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले त्याला सर्व उपस्थितांनी सोबत दिली. त्यानंतर न्यासाचे सचिव मधुसूदन राऊत यांनी न्यासाच्या वाटचालीचा आढावा सादर केला.

पारमिता धर्मादाय न्यासाच्या वतीने कल्याण पूर्व, पश्चिम आणि उल्हासनगर येथील १०वी व १२वीत शाळेतून पाहिले व दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, संविधानाची प्रत आणि प्रशस्तीपत्र देऊन पाहुण्यांच्या व न्यासाचे विद्यमान अध्यक्ष यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. ह्याप्रसंगी पारमिता धर्मादाय न्यास दरवर्षी मध्यमवर्गीय गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांना रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, संविधानाची प्रत व प्रशस्तीपत्र पत्र देऊन सन्मान करते हे फार अभिमानाचे व कौतुकास्पद आहे असे डॉ. संतोषकुमार फुलपगार आणि प्रा. डॉ अनुप्रिया ग्रीष्म खोब्रागडे म्हणाल्या. गुणवंत विद्यार्थी आणि पालकांनी सत्काराला उत्तर देताना अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करुन पारमिता धर्मादाय न्यासाने विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केल्याबद्दल न्यासाचे आभार मानले व आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पारमिता धर्मादाय न्यासाचे खजिनदार ॲड. अनिल मेश्राम यांनी केले तर आभार प्रदर्शन माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ. गंगाधर मेश्राम यांनी केले. शेवटी न्यासाचे अध्यक्ष बालकदास मेश्राम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




ठाणे ■ बुधवार
१८ फेब्रुवारी २०२६
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



# ठाण्यात धोकादायक इमारतीचा धोका

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** वागळे इस्टेट परिसरात किसननगर क्रमांक २ येथे अयोध्या कॉम्प्लेक्स या जुन्या इमारतीत छताचे प्लास्टर रविवारी रात्री ९:३० वाजता कोसळले. या घटनेत जीवितहानी झाली नसली तरी एका महिलेला किरकोळ दुखापत झाली आहे.

गुप्ता ऑइल डेपोसमोर, किसननगर क्रमांक २, वागळे इस्टेट येथील अयोध्या कॉम्प्लेक्स ही तळ अधिक पाच मजली अंदाजे ३० वर्षे जुने बांधकाम असलेली इमारत आहे. इमारतीच्या पाचव्या मजल्यावर रूम क्रमांक ५०५ मधील हॉलच्या छताचे प्लास्टर अचानक खाली कोसळले. ही सदनिका संभाजी मोरे यांच्या मालकीची आहे. घरात एकूण सहा जण वास्तव्यास आहेत. प्लास्टर कोसळताना घरात उपस्थित असलेल्या प्रेमा भोसले (वय ५८) यांना दुखापत झाली.

इमारतीची स्थिती तपासणार

घटनेची माहिती मिळताच वागळे प्रभाग समितीचे कर्मचारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, अतिक्रमण विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. इमारत जुनी असल्याने धोका टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे. इमारतीची स्थिती तपासण्याचे काम सुरू आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी विभागांकडून कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती पालिकेने दिली.

# पडघा येथील कुंभेरेश्वर महादेव मंदीरात दर्शनासाठी नागरीकांची प्रचंड गर्दी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील पडघा येथील मुंबई नाशीक महामार्गालगत असलेल्या कुंभेरी नदीकिनारी स्थित प्रसिद्ध कुंभेरेश्वर महादेव मंदीरात महाशिवरात्री निमीत्त दर्शनासाठी नागरीकांनी गर्दी केली होती.

महाशिवरात्रीचे औचित्य साधून कुंभेरेश्वर देवस्थान संस्थान यांच्या वतीने शिवसेना नेते व कुंभेरेश्वर देवस्थान संस्थान अध्यक्ष प्रकाश पाटील मंहत शिवरुपांनंद स्वामी, यांच्या मार्गदर्शनाखाली १५ ते १६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री उत्सव मोठ्या भक्तीभावाने साजरा करण्यात आला. यावेळी पहाटे महारुद्राभिषेक, होम हवन, किर्तन, महाआरती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंदीरात दर्शनासाठी मंदीरा बाहेर लांबच लांब रांगा लागल्या होत्या तर दुपारी वज्रेश्वरी महीला भजन मंडळ खडवली, गजानन प्रसादीक भजन मंडळ कल्याण, रुक्मिणी प्रसादीक भजन मंडळ कुंभारशिव यांनी भजन, तसेच प्रसिद्ध गायक जगदीश पाटील यांनी भक्तीगीत तर सायंकाळी माऊली हरीपाठ मंडळ वडवली यांनी सामुदायिक हरिपाठ सादर करून उपस्थितांची मने जिंकली यावेळी वैष्णव चॅरीटेबल ट्रस्ट, चिंतामणी हॉस्पिटल पडघा यांच्या वतीने आरोग्य शिबीर घेण्यात आले तर येणाऱ्या शिवभक्तांसांठी शिवसेना उपजिल्हाप्रमुख विष्णू चंदे,भाजपा पुर्व मंडळ तालुका अध्यक्ष श्रीकांत गायकर, माऊली सामाजिक संस्था अध्यक्ष मयुर दुबेले यांच्या वतीने फराळ व थंड शितपेयांची व्यवस्था करण्यात आली. होती तर मंदीरात विलास शेलार आणी त्यांचे सहकाऱ्यांनी "ऑपरेशन सिंदुर" यावर रेखाटलेली सुबक रांगोळी सर्वाचें लक्ष वेधुन घेत होती. तसेच विवीध स्टॉल्स,मनोरंजनाच्या उपकरणांसह मंदीर परीसरात मोठी जत्रा भरवण्यात आली होती यावेळी आमदार शांताराम मोरे,सरपंच सायली पाटील,मजुर फेडरेशनचे माजी अध्यक्ष पंडीत पाटील, श्रीकांत गायकर, गुरूनाथ जाधव, डॉ संजय पाटील, राजेश फाफे, दिनेश गंधे, संजय बिडवी, जगदीश पाटील उपस्थीत होते या महाशिवरात्री उत्सवाची सांगता दुसऱ्या दिवशी (सोमवारी) महाप्रसादाने करण्यात आली.

# मुंबई-गोवा महामार्गावरील तीन वेगवेगळ्या अपघातांत एकाचा मृत्यू




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : मुंबई-गोवा महामार्गावर वेगवेगळ्या तीन ठिकाणी झालेल्या अपघातांत एकाचा जागीच मृत्यू झाला, तर २ जण गंभीर जखमी झाले.

रविवार, १५ फेब्रुवारी रोजी रात्री ९.१५ वाजता झालेल्या अपघातात मोटार सायकलस्वार पदम शांताराम म्हात्रे हे मोटार सायकलवरून पेण-अलिबाग रस्त्याने पीएनपी पोर्ट येथे जात असताना मौजे कोळवे नाका गावाच्या हद्दीत मुंबई-गोवा हायवे ब्रिजखाली साई ढाबा हॉटेलसमोर आले असता मागून ट्रकने जोरदार धडक दिली. ते खाली पडल्यानंतर त्यांच्या पायावरून टायर गेल्याने (५४, रा. बोरी) हे गंभीर जखमी झाले. या घटनेची नोंद वडखळ पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार पाटील हे करत आहेत.

दुसरा अपघात सोमवार, १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास झाला. मोटार सायकलस्वार पुंडलिक नथुराम पाटील (७५, रा. रामवाडी, समर्थनगर, पेण) हे स्प्लेंडर मोटार सायकलवरून दादर गावातून मुंबई-गोवा मार्गाने येत असताना हॉटेल गिरोबासमोर पेणकडे जाणाऱ्या सर्विस रोडने खाली उतरत असताना समोरून येणाऱ्या लोखंडी पोलची वाहतूक करणाऱ्या पिकअप टेम्पोतील लोखंडी पोल डोक्याला लागून त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल घटनास्थळी पोहोचले. या घटनेची नोंद पेण पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास पोलीस सहाय्यक निरीक्षक विक्रम नवरखेडे हे करत आहेत.

तसेच दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास मुंबई-गोवा महामार्गावर हमरापूर फाटा पुलावर पनवेलकडे जाणारा बाईकस्वार नारायण हशा गडखळ (रा. शेणे ता. पेण) याला त्याच दिशेने जाणाऱ्या एसटीची धडक बसली. या अपघातात बाईकस्वाराला गंभीर दुखापत झाली. या अपघाताची माहिती मिळताच अपघातग्रस्तांचे वाली कल्पेश ठाकूर रुग्णवाहिका घेऊन घटनास्थळी पोहोचले. यावेळी तिथे उपस्थित असलेले समाजसेवक प्रकाश मोकल यांनी तत्काळ मोटार सायकल चालकाला उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. परंतु त्याची परिस्थिती गंभीर असल्याने त्याल पुढील उपचारासाठी एमजीएम रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या अपघात प्रकरणी दादर सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक संजय कुमार ब्राह्मणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार पाटील हे करत आहेत.

# मेट्रो अपघातग्रस्त कुटुंबाला यादव समाजाचा आधार



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : मुलुंडमध्ये मेट्रोच्या सुरु असलेल्या कामाचा एक स्लॅब कोसळला, ज्यामुळे घटनास्थळीच एकाचा मृत्यू झाला आणि इतर दोघांवर उपचार सुरू आहेत.

या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या रामधन यादव यांना मदत मिळवून देण्यासाठी रविवारी आर. एन. यादव यांच्यासह संपूर्ण यादव समुदायाचे सदस्य दिवसभर जबाबदार अधिकाऱ्यांकडून भरपाईच्या मागणीबाबत लेखी आश्वासन मागत राहिले, परंतु एमएमआरडीए किंवा उपकंत्राटदाराचा कोणताही अधिकारी प्रतिसाद देण्यासाठी उपलब्ध नव्हता. अखेर, दुपारी ४ वाजता, समुदायाच्या एका वरिष्ठ सदस्याने निर्णय घेतला की जर संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ठोस निकाल लागला नाही तर त्यांना रस्त्यावर उतरून निषेध करण्यास भाग पाडले जाईल. ही माहिती माध्यमांना आणि पोलिस ठाण्याला मिळाल्यावर, एक अधिकारी पीडितेच्या कुटुंबाशी बोलण्यासाठी पोलिस ठाण्यात पोहोचला.

रात्री १० वाजेपर्यंत निकाल लागला, परंतु रात्री धनादेशावर स्वाक्षरी न झाल्यामुळे, अधिकारी लेखी आश्वासन देऊन निघून गेले. रात्री धनादेश न मिळाल्याने, कुटुंब रुग्णालयातून मृतदेह घेऊ शकले नाही. आज सोमवारी धनादेश मिळाला आणि मृतदेह घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी आणि पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी शशिकांत यादव, ईश्वर देव यादव, पारस यादव, मोतीलाल यादव, राम यादव, जितेंद्र यादव, कमलेश यादव, आर.डी. यादव, राम झलक यादव, पप्पू यादव, जयसिंग यादव, कीर्ती यादव, रमेश यादव, सुरेश यादव, सुनील यादव, ईश्वर देव यादव आणि पारस यादव यांच्यासह सुमारे २०० समुदायाचे सदस्य उपस्थित होते. या सर्वांचे आर.एन. यादव यांनी मनापासून कृतज्ञता व्यक्त केली आणि सांगितले की पीडितेला न्याय समुदायाच्या एकजुटीमुळे मिळाला.

# पोलिसांच्या पहाऱ्यातून गुन्हेगार पसार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी शहरातील तहसीलदार कार्यालयात प्रांगणात असलेल्या सब जेल मधून सोनसाखळी व मोबाईल चोरी मधील अट्टल गुन्हेगाराने पोलिसांच्या हातावर तुरी देऊन रविवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास पलायन केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. पोलिसांनी या प्रकरणी गंभीर दखल घेत गुन्हा नोंद करून शोधकार्य सुरू केले आहे.

रवींद्र भोसले (वय २८,रा.देवजीनगर भिवंडी ) असे पळून गेलेल्या आरोपीचे नाव आहे.सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार रवींद्र भोसले यास रविवारी रात्री औषध व जेवण देण्या करीता सबजेल मधून बाहेर काढले होते.त्यावेळी बंदोबस्तावरील पोलिसांची नजर चुकवून तेथील लोखंडी जाळी तोडून आरोपी पसार झाला आहे.विशेष म्हणजे रवींद्र भोसले हा सोनसाखळी व मोबाईल चोरी मधील अट्टल गुन्हेगार आहे. भिवंडी गुन्हे शाखेच्या पोलिसांनी आठ दिवसांपूर्वी रवींद्र भोसले याला अटक केली होती.सोमवार (१६) पर्यंत पोलिस कोठडी असल्याने त्याला तहसीलदार कार्यालय आवारातील सब जेल मध्ये ठेवले होते.रवींद्र भोसले याविरोधात भिवंडी,कल्याण,ठाणे, उल्हासनगर, कर्जत रेल्वे व पुणे रेल्वे हद्दीत १६ गुन्हे दाखल आहेत.ज्यामध्ये ३ मोबाईल व १३ सोनसाखळी चोरीचे गुन्हे दाखल होते.त्याच्या जवळून १५ तोळे सोन्याचे दागिने व २१ मोबाईल असा आठ लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला होता. आरोपीच्या पलायनानंतर पोलिस प्रशासनात खळबळ उडाली असून शांतीनगर पोलिस ठाण्यात याची नोंद केली असून पोलिसांकडून आरोपीचा सर्वत्र शोध सुरू केला आहे.

# सामाजिक क्षेत्रात समानता व बंधुभाव निर्माण करणारा अखंड हरिनाम सप्ताह



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबाडी** : भिवंडी तालुक्यातील मौजे-कुसापूर कोयना पुनर्वसाहत लोकवस्तीतील गावात " अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित करण्यात आला होता.हा सोहळा मंगळवार दिनांक- 10/02/2026 ते दिनांक- 14/02/2026 अशा कालावधीत आयोजित करण्यात आला होता. या दरम्यान दिनांक- 12/02/2026 रोजी प्रवचन ह.भ.प.रवींद्र महाराज लोणे- बासे, कीर्तन ह.भ.प.महादेव महाराज जाधव- आकल्पे,दिनांक-11/02/2026 प्रवचन ह.भ.प.रवींद्र महाराज पाटील-वेढे,कीर्तन ह.भ.प.जगदीश महाराज आगिवले- कुंदे,दिनांक-12/02/2026 प्रवचन ह.भ.प.वासुदेव महाराज ठाकरे- एकसाल,कीर्तन ह.भ.प.महेंद्र महाराज भोईर-पहारे,दिनांक- 13/02/2026 प्रवचन ह.भ.प.अर्जुन महाराज जाधव- माडोशी,कीर्तन ह.भ.प.जितेंद्र महाराज आवारे- आळंदी.तसेच याच दिवशी दुपारी- 3: 30 ते 7: 30 वा. पर्यंत पालखी सोहळा.व सायंकाळी-7:00ते 7:30 दीपज्योती सोहळ्याचे अप्रतिम आयोजन करण्यात आले होते.

या अखंड हरिनाम सप्ताह सोहळयाचा समारोप ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज शेलार यांच्या काल्याचे कीर्तनाने दिनांक- 14/02/2026 रोजी सकाळी 12 वाजता करण्यात आला.हा " अखंड हरिनाम सप्ताह" साजरा करण्याचा शुद्ध हेतू असा की, " संत महात्म्यांच्या" उपदेशाचा प्रचार आणि प्रसार त्याचबरोबर "अखंड मनुष्य जीवनात समानता व बंधुभाव प्रस्थापित करणे." त्यादृष्टीनेच गेल्या 37 वर्षांपासून आम्ही मोठ्या भक्तिभावाने सर्व गावकऱ्यांच्या सहभागाने हा सोहळा आयोजित करीत आहोत,अशी प्रतिक्रिया याच गावातील प्रतिष्ठित व सुप्रसिद्ध कीर्तन- प्रवचनकार ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज शेलार यांनी संबंधित वृत्तप्रतिनिधी यांना दिली आहे.त्याचबरोबर आपल्या गावातील या पारमार्थिक सोहळयानिमित्त आबालवृद्ध या सर्वांचा खूप मोठा सहभाग असल्याने,या निमित्तानेच आम्ही " सुप्रसिद्ध कीर्तनकार,प्रवचनकार" यांना आमंत्रित करून भक्तिरूपाचा व संताचे विचार श्रवण लाभ देत आहोत असेही ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज शेलार यांनी यावेळेस आवर्जुन वृत्तप्रतिनिधी यांच्याकडे आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

या अखंड हरिनाम सप्ताह करिता स्वखुशीने अन्नदान करणारे शशिकांत शेलार,मनोहर शेलार,निवृत्ती शेलार,अंकुश शेलार,पांडुरंग शेलार,मारूती शेलार,रखमाजी शेलार,बाबू शेलार,ऋषिकेश शेलार,कासाई,मानाई,जानाई महिला मंडळ कुसापूर आदिं महत्त्वपूर्ण अन्नदात्यांचा सहभाग होता.

एकंदरीत परिसरातील एक आदर्श आणि एकसंघतेची पारमार्थिक भावना जोपासून हा सोहळा समारोप प्रसंगी समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर व कर्तृत्ववान व्यक्तिंचा सन्मान करण्यात आला हे या सप्ताहाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य सांगता येतील.

# रस्ता अभियान फलकावरील संपर्क क्रमांक शोधण्यासाठी मोहीम सुरू




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** रायगड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या रस्त्यावर वाहने चालविणे म्हणजे कमर व मानेचा पट्टा अनेकांच्या जीवनात आलेला आहे, त्याच बरोबर दोन व चार चाकी वाहनावरील दुरुस्ती खिशाला खर्चाची आपत्ती हा वेगळा सोसावा लागत आहेच, पण बोलणार कोण?आणी बोलले तर अमंलबजावणी करणार कोण? ,कधी तरी वृत्तपत्रात कळते करोडो रुपये खर्च होउन कागदोपत्रीच, मान्यवरांकडून उद्घाटन होउन त्याचे काम न होता बीले अदा झालेली असतात असेही मान्यवर राजकिय पदाधिकाऱ्यांकडून ऐकावयास मिळत आहे.असो त्याकडे सामान्य नागरिक दुर्लक्ष करतात. नुकताच नागरिकाचें अपघात होऊ नये यासाठी रायगडात रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत सीटबेल्ट व पालकांसाठी सुंदर फलक जिलहाभर लावण्यात आले,त्या बद्दल उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. माधव सूर्यवंशी हे उत्तम अधिकारी लाभले आहेत. त्याच्या कार्यालयातील बॅनर बनविण्याची जबाबदारी दिलेल्या अधिकारीनी लक्ष न दिल्याने त्यामधे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय पेणचा संपर्क मोबाईल क्रमांकाचा शोध घ्या,या बाबत आमचे मित्र प्रा.शाम जोगळेकर यांनी व अनेक वकिल मित्रांनी दिली तेव्हा आम्हाला मो.9270446777 वर कळवा,रुपये 500 बक्षिस देऊ,जनतेच्या सुरक्षेसाठी आणी परिवहन बाबतीत संपर्क क्रमांक असता तर नागरिकानां विधायक सुचना देता आल्या असत्या अशी चर्चा रायगडात सुरु आहे अशी माहिती जेष्ठ पत्रकार, रायगड भूषण प्रा.डॉ.जयपाल पाटील, आपत्ती व्यवस्थापन तज्ञ, अलिबाग यांनी दिली. संपर्क साधण्यासाठी मो.9673727277 दिला आहे.




# टिटवाळा पश्चिम वासुंद्री रस्त्यावरील सीसीटीव्ही अनेक महिन्यांपासून बंद




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शहरातील वाढती वर्दळ, गुन्हेगारीच्या घटना आणि सुरक्षिततेबाबतची चिंता लक्षात घेता सीसीटीव्ही कॅमेरे हे पोलिस तपासाचे डोळे मानले जातात. मात्र ज्या कॅमेऱ्यांवर नागरिकांची सुरक्षा अवलंबून आहे, तेच कॅमेरे बंद पडल्याने टिटवाळा पश्चिमेतील वासुंद्री रस्त्यावरील परिस्थिती गंभीर बनली आहे. पंचवटी चौक, ज्ञानेश्वर मंदिर परिसर, तसेच पाटील नगराच्या पुढे महाकालेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या चौकातील रस्त्यावर बसवण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे अनेक महिन्यांपासून निष्क्रिय अवस्थेत असल्याचे समोर आले आहे. वासुंद्री रस्ता हा परिसरातील अत्यंत वर्दळीचा आणि संवेदनशील मार्ग मानला जातो. मंदिर परिसर, रहिवासी वसाहती, दुकाने आणि सततची वाहनांची ये-जा यामुळे येथे दिवसरात्र गजबजाट असतो. अशा ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत असणे अत्यावश्यक असताना ते बंद असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. चोरी, छेडछाड, अपघात किंवा अन्य गुन्हेगारी घटना घडल्यानंतर पोलिस तपासात सीसीटीव्ही फुटेज हा अत्यंत पोलिस तपासात महत्त्वाचा दुवा ठरतो. मात्र हे कॅमेरेच बंद असल्याने तपासात अनेक महत्त्वाचे धागे निसटतात, गुन्हेगारांचा माग काढणे कठीण होते आणि तपास अधिक क्लिष्ट बनतो.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक वेळा संबंधित यंत्रणेकडे तक्रारी करूनही या कॅमेऱ्यांच्या दुरुस्तीबाबत ठोस पावले उचलण्यात आलेली नाहीत. “स्मार्ट सिटी, सुरक्षित शहर अशा घोषणा केल्या जातात, पण प्रत्यक्षात आमच्या परिसरातील कॅमेरे महिनोन्महिने बंद आहेत. एखादी गंभीर घटना घडल्यावर जबाबदारी कोण घेणार?” असा सवाल संतप्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी महिलांमध्ये आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली असल्याचेही चित्र आहे.म्यान, टिटवाळा शहरातील इतर भागांमध्येही सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या देखभालीचा प्रश्न वारंवार उपस्थित होत आहे. कॅमेरे बसवणे ही एक बाजू असली तरी त्यांची नियमित देखभाल, दुरुस्ती आणि कार्यरत स्थिती कायम ठेवणे तितकेच महत्त्वाचे आहे. अन्यथा हे कॅमेरे केवळ खांबावर लटकलेली शोभेची साधने ठरून राहतात, असा टोला नागरिकांकडून लगावला जात आहे. एकूणच, वासुंद्री रस्त्यावरील बंद सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा प्रश्न तातडीने मार्गी लावणे गरजेचे आहे. संबंधित महापालिका, स्मार्ट सिटी यंत्रणा आणि पोलिस प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कॅमेरे सुरू करण्यासाठी ठोस कारवाई करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. नागरिकांची सुरक्षा ही केवळ कागदावरील योजना न राहता प्रत्यक्षातही दिसली पाहिजे, हीच अपेक्षा आता व्यक्त केली जात आहे. दरम्यान याबाबत स्मार्ट सिटी विभाग अंतर्गत सीसीटीव्हीच्या मेटेनन्स विभागातील प्रमोद कांबळे यांच्याशी विचारणा केली असता मी माहिती घेऊन कळवतो असे सांगितले.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024